# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ११४–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. सुखदेव पांडुरंग भंडे,<br>मु.पो. मायथाळ, ता. जत, जि. सांगली | अर्जदार |

**विरूध्द**

| | |
|---|---|
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली

**<u>कोरम</u>** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी.बी.पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

## महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग

(ग्राहक तक्रार निवारण मंच)

विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. सुखदेव पांडुरंग भंडे, मु.पो. मायथाळ, ता. जत, जि. सांगली यांनी नवीन शेतीपंप वीज पुरवठा मिळावा यासाठी दि. ०६.०५.२००९ रोजी अर्ज केला आहे. तक्रारदाराचे म्हणणे की, वितरण वाहिनीचा विस्तार असलेने त्यांना दि. ५.६.२००९ पर्यंत चलन मिळणे जरुरी होते, ते मुदतीत दिले नाही. त्यामुळे प्रस्तुतची तक्रार मंचासमोर दाखल केली. त्यापूर्वी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दि. २७.४२०१० ला तक्रार दाखल केली. अंतर्गत कक्षाने दि. २८.४.२०१० रोजी आदेश पारित केला त्यामध्ये विलंबाबाबत कृती मानकातील तरतुदीनुसान भरपाई द्यावी असे आदेश दिले.

या आदेशाच्या नाराजीने तक्रारदाराने मंचाकडे दि. ४.६.२०१० रोजी प्रतिनिधी श्री. खापरे यांच्यामार्फत नमुना अ मध्ये तक्रार दाखल केली.

वितरण कंपनीने आपल्या दि. २९.६.२०१० च्या लेखी अहवालात तक्रारदाराचा शेतीपंप नवीन वीज पुरवठा मागणी अर्ज दि. ६.५.२००९ ला प्राप्त झाल्याचे मान्य केले व त्यांस दि. ८.२.२०१० रोजी चलन देण्यात आले. त्यांचे ०३० कि.मी. लघुदाब वाहिनीचे काम आहे.

प्रस्तुतची तक्रार मंचासमोर दि. २७.७.२०१० ला सुनावणीस घेतली असतां, तक्रारदाराचे प्रतिनिधी श्री. खापरे उपस्थित. वि.प.तर्फे प्रभारी सहाय्यक अभियंता संख श्री. मैंलापुरे व श्री. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता, कवठे महांकाळ विभाग उपस्थित. तक्रारदार प्रतिनिधी यांनी चलन मिळाल्याच्या तारखेचा ८.२.२०१० चा वाद उत्पन्न केला. वि.प.ने तक्रारदारास चलन दिल्याचा तारखेचा पुरावा हजर करावा अशी मागणी केली. तसेच वाहिनी विस्तार आहे, प्रोसेसिंग फी भरुन स्पॉट इन्स्पेक्शन झाले आहे, चलन देण्यास विलंब झाला आहे यासाठी भरपाई मिळावी अशी मागणी केली. या उलट, वि.प.चे अधिकाऱ्यांनी विलंबाबाबत कुठलेही स्पष्टीकरण दिले नाही, मात्र चलन तक्रारदारास बजावल्याबद्दल पुरावा देण्याची तयारी दर्शविली.

वरील विवेचनावरुन खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) तक्रारदार यांस कृती मानके विनियमातील तरतुदींचे पालन करण्यात अपयश आल्याने वितरण कंपनी भरपाई देण्यास जबाबदार आहे काय ?

उत्तर : होय

आदेश ?

खालील प्रमाणे –

<u>कारणमिमांसा</u>

उभयबाजूने तक्रारदार यांनी दि. ०६.०५.२००९ ला अर्ज केला व वितरण वाहिनीचा विस्तार असल्याचे मान्य के. त्यामुळे दि. ५.६.२००९ पर्यंत चलन देणे कायदेशीर होते ते न दिल्याचे उघड आहे. त्यामुळे दि. ५.६.२००९ ते दि. ८.२.२०१० या कालावधीतील ३३ आठवडे विलंबापोटी तक्रारदार यांस प्रति आठवडा रु. १००/– प्रमाणे रु. ३३००/– देणे योग्य व कायदेशीर होईल. खालील प्रमाणे आदेश –

## <u>आदेश</u>

१) तक्रारदाराची तक्रार मंजूर करण्यात येत आहे.
२) वि.प.ने दि. ५.६.२००९ ते दि. ८.२.२०१० या कालावधीतील ३३ आठवडे विलंबापोटी तक्रारदार यांस प्रति आठवडा रु. १००/– प्रमाणे रु. ३३००/– कृती मानके विनियमातील तरतुदीचे पालन करण्यात अपयश आल्याने भरपाई द्यावी.
३) सदरची रक्कम ३ बिलींग सायकलमध्ये समायोजित करण्यात यावी व उर्वरित रक्कम तक्रारदार यांस रोखीने देणेत यावी.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी.बी.पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

( बी. जी. पवार )
अध्यक्ष